# गिरगाव-काळबादेवीतील मेट्रोची ७५ टक्के कामे पूर्ण



मुंबई : पुढारी वृत्तसेवा

अत्यंत गजबजलेल्या काळबादेवी, गिरगाव, सीएसटी, ग्रँट रोड या भागातील मेट्रो-३ ची जवळपास ७५ टक्के कामे पूर्ण झाली असून डिसेंबर २०२३ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

या भागात बोगद्यांची कामे ९५ टक्के पूर्ण झाली आहेत. स्थानकांची कामे ५६ टक्के पूर्ण झाली आहेत. एकूण कामे ७५ टक्के झाली आहेत, असे ट्विट मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी गुरुवारी केले. अन्य भागाच्या तुलनेत या भागातील कामे आव्हानात्मक आहेत. जुन्या इमारती, हेरिटेज इमारती,सरकारी व खासगी आस्थापने-कार्यालये यामुळे हे विभाग गजबजलेले आहेत.त्यातही काळबादेवी आणि गिरगाव या दोन ठिकाणी प्रकल्प अधिकच आव्हानात्मक आहे. भूमिगत प्रकल्पामुळे जुन्या इमारतींना तडे गेल्याच्या तक्रारी बोगदा खोदण्याची कामे सुरू झाल्यानंतर येत होत्या.आता हा प्रकल्प जवळपास दृष्टिक्षेपात आला आहे.